# मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),गडचिरोली यांचे कार्यालय.

वन प्रशासकीय भवन, पोटेगांव रोड, गडचिरोली-442605 (महाराष्ट्र)

दुरध्वनी क्र. 07132-233184 फॅक्स क्र. 07132-233187 Email-ccftgadchiroli@maforest.gov.in


क्रमांक कक्ष-3(1)/तेंदु/विक्री/ 1746 गडचिरोली, दिनांक :- 21/8/2025

प्रति,

उप वनसंरक्षक,
आलापल्ली/भामरागड/गडचिरोली/सिरोंचा/गडचिरोली, वनविभाग.

विषय :- माहे सप्टेंबर/2025 करीता इमारती माल, जळाऊ बिटे व लांब बांबू वनोपजाचे लिलावाचे आयोजन करणे बाबत.

संदर्भ :- मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त चंद्रपूर यांचे पत्र क्र. कक्ष-1(1)/विक्री/25-26./ 843 दि. 06.06.2025

चंद्रपूर व गडचिरोली वनवृत्तातील वनोपजाचे लिलावाकरीता एकसुत्रता राहावी व दोन्ही वनवृत्तासाठी जास्तीत जास्त दिवस उपलब्ध व्हावेत या उद्देशाने मुख्य वनसंरक्षक चंद्रपूर वनवृत्त यांनी दिनांक 12.06.2025 रोजी व्ही.सी. द्वारे सभा घेवून गडचिरोली व चंद्रपूर वनवृत्ताकरीता लिलाव तारखा निश्चीत केलेल्या आहेत.

त्यानुसार गडचिरोली वनवृत्तातील इतर किसम इमारती करीता दिनांक 1 ते 10 व 29, 30/31 व साग इमारती करीता दिनांक 11 ते 19 अशा तारखा मंजुर केलेल्या आहेत.

वरीलप्रमाणे मंजुर तारखानुसार माहे सप्टेंबर/2025 या महिण्यात इमारती मालाचे ई-लिलाव साठी (दिनांक 7, व 14 रवीवार व 5 ईद-ए-मिलाद असे शासकिय सुट्टीचे दिवस तसेच दिनांक 1 ला नागपूर येथे सुट्टी असल्याने सुट्टी चे दिवस वगळुन) खालीलप्रमाणे विभागनिहाय लिलाव तारखा आवंटीत करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | वनविभाग | इतर किसम इमारती करीता | साग इमारती करीता | जळाऊ बिटे व बांबू करीता |
|---|---|---|---|---|
| 1 | वडसा | दि. 2 सप्टेंबर पुर्ण दिवस | दि. 11 सप्टेंबर पुर्ण दिवस | दि. 11 सप्टेंबर पुर्ण दिवस |
| 2 | गडचिरोली | दि. 3 सप्टेंबर पुर्ण दिवस | दि. 12 सप्टेंबर पुर्ण दिवस | दि. 12 सप्टेंबर पुर्ण दिवस |
| 3 | आलापल्ली | दि. 9 व 10 आणि 29, 30 सप्टेंबर पुर्ण दिवस | दि. 15 व 16 सप्टेंबर पुर्ण दिवस | दि. 9 व 10 आणि 29, 30 सप्टेंबर पुर्ण दिवस (जळाऊ) व 10 सप्टेंबर बांबू |
| 4 | सिरोंचा | दि. 4, 6 व 8 सप्टेंबर पुर्ण दिवस | दि. 17 व 18 सप्टेंबर पुर्ण दिवस | दि. 17 व 18 सप्टेंबर पुर्ण दिवस |
| 5 | भामरागड | दि. 2 सप्टेंबर दुपारनंतर | दि. 19 सप्टेंबर पुर्ण दिवस | दि. 19 सप्टेंबर पुर्ण दिवस |

वरीलप्रमाणे तारखांनुसार आपले वनविभागातील इमारती माल वनोपजाचे ई-लिलावाचे आयोजन करतांना दिनांक 1 एप्रिल/2025 पासुन दररोज सकाळी 9.00 वा. ते सायंकाळी 6.55 वा. पर्यंत प्रति बॅच 6 लॉट याप्रमाणे प्रति दिवस 1070 लॉटस् लिलावात ठेवावयाचे आहेत. तरी लिलाव नियमानुसार लिलाव तारखेच्या 8 दिवसापुर्वी लिलावाकरीता आवश्यक असलेली सर्व माहिती व फोटोग्राफ एनआयसी. समन्वयक, निर्देशन विभाग यांचेकडे सुपूर्द करावे. विहीत वेळेत सदरची माहिती प्राप्त न झाल्यास त्या तारखेचा लिलाव रद्द करण्यात येईल याची नोंद / दक्षता घ्यावी. करीता माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.

(एस. रमेश कुमार)
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
गडचिरोली

प्रतिलीपी :- प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) म.रा. नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
प्रतिलीपी :- एनआयसी. समन्वयक, निर्देशन विभाग, गडचिरोली यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित